शेकडो शेतकऱ्यांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा >>पान 2

ग्रामस्थांनी स्वच्छता ही सेवा मोहिमेत सहभागी होऊन आपले गाव स्वच्छ करावे - सीईओ मंदार पत्की >>पान 3

निवडणुकीच्या तोंडावर मेळाव्याची चढाओढ >>पान 4

दैनिक
# आपला विदर्भ

**सुविचार**
चुकीचा व्यवहार माणसं तोडतो म्हणून तो सत्याने आणि सन्मानाने करा.

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



बांधकाम कामगारांना विविध योजनांच्या माध्यमातून सामाजिक सुरक्षा - उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस
आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 46 ■ रविवार, दि. 22 सप्टेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# महाराष्ट्र देशाच्या तर एमएमआर महाराष्ट्राच्या प्रगतीचे इंजिन -मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## मुख्यमंत्र्यांचे बदलते ठाणे..! आपलं ठाणं विकासाचं खणखणीत नाणं..!

**दैनिक आपला विदर्भ**

**ठाणे/प्रतिनिधी :** देशाचे पॉवर हाऊस होऊ शकेल इतकी ताकद महाराष्ट्रामध्ये आहे. महाराष्ट्र हे देशाच्या प्रगतीचे इंजिन आहे, तर आपलं ठाणं विकासाचं खणखणीत नाणं असल्याचे उद्गार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काढले.

डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे आयोजित 'मुंबई महानगर प्रदेश अंतर्गत' 'ठाणे विकास परिषद-२०२४' कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी राज्य उत्पादन शुल्क तथा ठाण्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई, नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष राजेश क्षीरसागर, खासदार नरेश म्हस्के, आमदार प्रताप सरनाईक, माजी आमदार रवींद्र फाटक, 'मित्रा' चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल, मुंबई झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरभ राव, 'मित्रा' चे सह मुख्य कार्यकारी अधिकारी सुशील खोडवेकर व अमन मित्तल, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाचे सदस्य सचिव अविनाश ढाकणे, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, पर्यटन विभागाचे संचालक बी. एन. पाटील, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त





डॉ. कैलास शिंदे, उद्योग विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह, अतिरिक्त विकास आयुक्त प्रदीप चंद्रन, एमएमआरडीचे विक्रमकुमार, कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त इंदूराणी जाखड, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक शंतनू गोयल, ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल भंडारी, मीरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त संजय काटकर, भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेचे आयुक्त अजय वैद्य, वसई-विरार महानगरपालिका आयुक्त अनिल पवार, अप्पर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये-धुळे, जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी, उद्योग सहसंचालक विजू शिरसाठ आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, आपण मुंबई महानगर प्रदेशात पाच सेक्टर्समध्ये जर धोरणात्मक काम केले तर आपली अर्थव्यवस्था १.५ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचण्याची क्षमता या मुंबई महानगर प्रदेशात आहे. यामुळे सर्वांना उद्योग, सर्वांना रोजगार, सर्वांना घरे, हरित ठाणे अशा सर्व गोष्टी साध्य करु शकतो. ठाण्यामध्ये काही गोष्टी सुरु होतात, मग नंतर त्या इतर सर्व ठिकाणी सुरु होतात, असा हा ठाण्याचा इतिहास आहे. महाराष्ट्र हे देशाचे पॉवर हाऊस होईल, इतकी ताकद महाराष्ट्रामध्ये आहे.

ते म्हणाले, शेतीनंतर रिअल इस्टेट जास्त रोजगार देणारे क्षेत्र आहे. महाराष्ट्र आता जीडीपी, परदेशी गुंतवणूक, पायाभूत सुविधांचे जाळे निर्माण करण्यात अशा विविध क्षेत्रात पहिल्या क्रमांकावर आहे. देशाच्या एकूण गुंतवणुकीपैकी ५२ टक्के ही एकट्या महाराष्ट्राची आहे. अटल सेतूमुळे आपण आता मुंबई ते नवी मुंबई हा प्रवास फक्त २० मिनिटात करू शकतो. या प्रकल्पाबाबत आधी फ्लेमिंगो पक्षी नाहीसे होतील अशी टीका करण्यात आली. मात्र, पर्यावरण विषयक काम करणाऱ्या संस्थांनी प्रत्यक्षात फ्लेमिंगोंची संख्या दुप्पट झाल्याचा अहवाल दिला आहे. अटल सेतू हा मार्ग एक गेम चेंजर प्रकल्प ठरला आहे. समृद्धी महामार्गामुळे ८ तासात आपल्याला नागपूरला पोहोचता येते. लवकरच ठाणे ते बोरिवली प्रवास आपण २० मिनिटात करू शकणार आहोत. ईस्टर्न फ्री वेचा विस्तार करण्यात येत आहे. विरार-अलिबाग कॉरिडोरचे काम सुरु होत आहे. असे विविध प्रकल्प साकारताना, विकासकामे करताना जास्तीत जास्त प्रमाणात आधुनिक तंत्रज्ञान वापरले जात आहे. नवी मुंबई विमानतळाचे काम लवकर पूर्ण होणार आहे. पालघरला तिसरे विमानतळ तयार करीत आहोत. आपल्याकडे उद्योगासाठी >>पान २

## ९ वर्षीय चिमुकलीवर अत्याचार करणारा नराधम 'स्केच'च्या आधारे जेरबंद

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूर शहरातील पारडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत नऊ वर्षीय चिमुकलीवर अत्याचार करणाऱ्या नराधमाला स्केच'च्या आधारे जेरबंद करण्यात पोलिसांना यश आले. पारडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली होती. नराधमाला अटक केल्याचं पोलीस निरीक्षक रणजित शिरसाट यांनी सांगितले. नागपुर शहराचे पोलीस आयुक्त रवींद्र सिंघल या संदर्भात आज पत्रकार परिषद घेऊन आरोपीबाबत खुलासा करणार आहेत.घटनेला सहा दिवस उलटूनही आरोपी सापडत नसल्यानं शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेत्या व माजी महापौर किशोरी पेडणेकर आज पारडी पोलीस ठाण्यात आंदोलन करणार होत्या. मात्र, त्याआधीच आरोपी सापडल्यामुळे किशोरी पेडणेकर यांनी आंदोलन मागे घेतले. आरोपीला कठोर शिक्षा होईल या अनुषंगाने पोलिसांनी कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केलीय.

## इंजेक्शन देऊन बेशुद्ध अवस्थेत अल्पवयीन मुलीवर बलात्कार; २ वर्षानंतर आरोपीला अटक

**पुणे/प्रतिनिधी :** राज्यात महिला आणि मुलींवरील अत्याचाराच्या घटना काही कमी होताना दिसत नाहीत. बदलापूरच्या घटनेमुळं संपूर्ण देश हादरलेला असताना राज्यातील विविध भागांमधून म हिला अत्याचाराच्या घटना सम ोर येत आहेत. त्यातच आता पुण्यातील बंडगार्डन पोलीस स्टेशनच्या हद्दीत अशीच घटना घडल्याचं समोर आलय. दोन वर्षापूर्वी नात्यातील एका तरुणानं १४ वर्षीय शाळकरी मुलीवर अत्याचार केल्याचं उघडकीस आलय. मुलीच्या आईनं केलेल्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करत २१ वर्षीय आरोपीला अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा संपूर्ण प्रकार दोन वर्षापूर्वी घडलाय. त्यावेळी पीडित मुलगी ही इयत्ता सहावीमध्ये शिकत होती. आरोपी तरुणानं पीडित मुलीच्या दंडावर इंजेक्शन देऊन तिला बेशुद्ध केलं. त्यानंतर तिच्यासोबत शरीर संबंध ठेवले. एवढंच नाही तर हे करत असताना आरोपीनं फोटो देखील काढले. त्यानंतर

## पुणे विमानतळाला जगदगुरू संत तुकाराम यांचे नाव देण्यात देणार

### देवेंद्र फडणवीसांची पुण्यात मोठी घोषणा

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी :** पुणे विम ानतळाला जगतगुरू संत तुकाराम महाराज यांचे नाव देण्यात येणार आहे, अशी घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. आज देवेंद्र फडणवीस हे पुणे पालखी मार्ग भूमीपूजन सोहळ्यात बोलत होते. पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांनी यासंबंधी सरकारला प्रस्ताव दिला होता, तो आम्ही स्वीकारला आहे, येत्या कॅबिनेटमध्ये या प्रस्तावाला मंजुरी मिळेल अशी माहिती आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी म्हटले आहे.



जगतगुरू संत तुकाराम महाराज यांचे नाव पुणे विम ानतळाला देण्यात येणार आहे. पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांनी नावासंदर्भातील प्रस्ताव सरकारला दिला होता, तो आम्ही स्वीकारला आहे, येत्या कॅबिनेटमध्ये या प्रस्तावाला मंजुरी मिळेल अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. आज ते पुण्यात पालखी मार्ग भूमीपूजन सोहळ्यात बोलत होते.

नवीन विमानतळ तयार करण्यात येणार आहे, त्याला छत्रपती संभाजी महाराजांचे नाव द्यायचे आहे. परंतु पुण्यात जे विमानतळ आहे, जे नव्या पद्धतीने बनवण्यात आले आहे, त्याचे नामकरण जगद्गुरू तुकाराम महाराजांच्या नावाने व्हावे, अशीसंकल्पना खासदार मुरलीधर मोहोळ यांनी मांडली होती. त्यावर तात्काळ काम आम्ही सुरू केलेय. येत्या कॅबिनेटला आम्ही तो प्रस्ताव मांडून मंजूर करून घेणार आहोत. त्यानंतर हा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवणार आहोत. त्यानंतर हा प्रस्ताव मंजूर करून घेण्याची जबाबदारी मुरलीधर मोहोळ आणि नितीन गडकरी यांची असेल असेही फडणवीसांनी म्हटले आहे. जगद्गुरू तुकाराम महाराजांचे नाव विमानतळाला दिले, तर त्याचा सगळ्यांना आनंद होईल, असेही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत.

## अदलाबदली होणारच! महाविकास आघाडीची २८८ जागांवर पहिल्या टप्प्यातली चर्चा पूर्ण

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** म हाविकास आघाडीची २८८ जागांवर पहिल्या टप्प्याची चर्चा पूर्ण झालीय. तिढा असलेल्या जागांवर आता दुसऱ्या टप्प्यात चर्चा होईल. तिढा असलेल्या जागांबाबत वरिष्ठ नेत्यांच्या बैठकीत अंतिम निर्णय घेतला जाईल. त्यासाठी तीनही पक्षांकडून एकत्र सर्व्हे केला जाईल. ३० ते ३५ जागांमध्ये दोन ते तीन पक्ष आग्रही असल्याने यातल्या जागा दुसऱ्या टप्प्यात चर्चेसाठी घेतल्या जातील. काही जागांमध्ये अदलाबदल केला जाणार आहेत. महाविकास आघाडी लवकरच नेत्यांचे दौरे आणि संयुक्त मेळाव्याबद्दल कार्यक्रम जाहीर करणार आहे.

महाविकास आघाडी लवकरच संयुक्त मेळावे आणि नेत्यांच्या दौऱ्यांच्या कार्यक्रमाचे नियोजन करून विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचाराच्या रिंगणात उतरणार आहे. २०१९ ला जिंकलेल्या जागांमध्ये बहुतांश जागा या त्या पक्षालाच ठेवण्यावर चर्चा सकारात्मक झाल्याची माहिती आहे. काही जागांमध्ये अदलाबदल केला जाणार आहे. साधारणपणे ३० ते ३५ जागांमध्ये दोन किंवा तीन पक्ष आग्रही असल्याने यातील जागा दुसऱ्या टप्प्यात चर्चेसाठी घेणार आहे. महाविकास आघाडी लवकरच नेत्यांचे दौरे आणि संयुक्त मेळाव्याबद्दल कार्यक्रम जाहीर करणार आहे.

भाजप-शिवसेना (शिंदे गट) सरकारचा कार्यकाळ नोव्हेंबर २०२४ मध्ये संपणार आहे. सध्या महाराष्ट्रात भाजप-शिंदे गटाचे सरकार आहे. त्याचा कार्यकाळ नोव्हेंबर २०२४ मध्ये संपत आहे. ऑक्टोबर २०२४ मध्ये निवडणुका होऊ शकतात. २०१९ मध्ये महाराष्ट्रात विधानसभेच्या २८८ जागांवर निवडणुका झाल्या. १०६ आमदारांसह भाजप राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरला होता.

मुख्यमंत्री पदाबाबत शिवसेना आणि भाजप यांच्यात युती होऊ शकली नाही. शिवसेनेने ५६ आमदारांसह काँग्रेससह ४४ आमदारांसह राष्ट्रवादी काँग्रेसने ५३ आम दारांसह महाविकास आघाडी स्थापन करून सरकार स्थापन केले. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले. मे २०२२ मध्ये, महाराष्ट्र सरकारचे नगरविकास मंत्री आणि शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी ३९ आमदारांसह बंडखोरी केली. त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. ३० जून २०२२ रोजी एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्राचे २० वे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. शिवसेना दोन गटात विभागली गेली. एक गट शिंदे गटाचा तर दुसरा उद्धव गटाचा होता. १७ फ ेब्रुवारी २०२३ रोजी निवडणूक आयोगाने पक्षाचे नाव 'शिवसेना' आणि पक्षाचे निवडणूक चिन्ह 'धनुष्यबाण' एकनाथ शिंदे गटाकडेच राहण्याचे आदेश दिले.

## लाडकी बहीण योजनेत फसवणूक कराल तर खबरदार! प्रशासन ॲक्टीव्ह मोडवर, गैरप्रकाराचे ३० गुन्हे दाखल

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात एकनाथ शिंदे सरकारने राज्यातील महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली आहे.शासनाच्या या योजनेचा लाभ महाराष्ट्रातील लाखो महिलांना मिळत आहे. म ात्र या योजनेतही अनेक गैरप्रकार होताना दिसून येत आहेत. याम ध्ये अनेक जण फसवणूक करत आहेत. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेची नोंदणी अजूनही सुरूच आहे. या योजनेचा लाभ मिळवण्यासाठी राज्यात अनेक ठिकाणी गैरप्रकार झाल्याची प्रकरणे समोर आली आहेत.या योजनेचा लाभ मिळवण्यासाठी ऑनलाइन अर्ज भरताना आधार कार्डचा नंबर वापरून गैरप्रकार झाल्याचे उघडकीस येत आहे. याप्रकरणी राज्यभरातून हजारो तक्रारी दाखल झाल्या आहेत. आतापर्यंत पुणे, सातारा, सांगली, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर या ठिकाणी ३० गुन्हे दाखल करण्यात आल्याची आणि या प्रकरणात, संबंधितांना ताब्यात घेण्यात आले आहे.

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या माध्यमातून सरकारकडून महिलांना दरम हिन्याला दीड हजार रुपये देण्यात येतात. या योजनेसाठी राज्यात्या कानाकोपऱ्यातून ऑनलाइन-ऑफलाइन अर्ज भरण्यास सुरुवात करण्यात आली. या योजनेंतर्गत अर्ज भरण्यासाठी राज्य सरकारने या महिन्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत म्हणजेच ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. एकाच महिलेच्या नावाने २८ अर्ज भरण्यात आले आहेत. यापैकी केवळ एक अर्ज मंजूर झाला आहे. उर्वरित २७ अर्ज रद्द करण्यात आले आहेत. सातारा जिल्ह्यात दाम्पत्याने बनावट कागदपत्रे दाखवून अनेक अर्ज भरल्याचा प्रकार उघडकीस आला. दोघांनाही अटक करण्यात आली आहे, त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



योजनेची अर्ज नोंदणी सुरू असली, तरी कागदपत्रांची सखोल तपासणी करून अर्ज मंजूर करण्यात यावेत असे आदेश जिल्हास्तरावर देण्यात आला आहे. गैरप्रकार करून या योजनेचा लाभ घेतला असल्यास संबंधितांवर गुन्हे दाखल करून केला जाईल त्याचबरोबर मि ळालेल्या लाभाची रक्कम वसूल करण्यात येत आहे.

छत्रपती संभाजीनगरमध्ये एकाच व्यक्तीने पत्नीच्या नावाने ३० अर्ज भरून योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न केला. विशेष म्हणजे विविध बँक खात्यांचे नंबर देऊन वेगळ्याच व्यक्तीचा आधारकार्डाचा नंबर आणि फोटो बदलून कागदपत्रे जोडल्याचे आढळून आले आहे. पुणे, मुंबई, पनवेल, नागपूर या ठिकाणी देखील अशाच घटना समोर आल्या आहेत. राज्यभरातून प्राप्त झालेल्या तक्रारी, तसेच संशयास्पद कागदपत्रांच्या आधारावर ३० ठिकाणी गुन्हे दाखल केले असल्याची माहिती महिला व बालविकास खात्याचे आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांनी दिली आहे.

या योजनेच्या अंम लबजावणीवर सरकार बारीक लक्ष ठेवून आहे. बनावट कागदपत्रे सादर करून या योजनेचा लाभ घेणाऱ्या लोकांची सरकार ओळख करून देत आहे. बनावट दस्तऐवज अर्ज करून कोणी लाभ घेतला असेल तर. त्यामुळे सरकार अशा लोकांकडून वसुलीही करू शकते आणि अशा लोकांना तुरुंगातही पाठवू शकते.

## जे बोलतो ते पत्थर की लकीर, महाशक्ती संपूर्ण २८८ जागा लढवणार अन् मुख्यमंत्रीही आमचाच; कडूंचा दावा

**दैनिक आपला विदर्भ**

**अमरावती/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात राजकीय घडामोडींना आता चांगलाच वेग आला आहे. त्या अनुषंगाने जवळ जवळ सर्वच राजकीय पक्षांनी बैठका, दौरे, संवाद सुरु केलाय. तसेच अनेक नवख्या उमेदवारांनी देखील मोर्चेबांधणीला सुरुवात केलीय. दरम्यान, प्रहार पक्षाचे सर्वे सर्वा आणि आमदार बच्चू कडू यांनी छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या सभेनंतर वेगळा पवित्रा घेत महाशक्ती म्हणून आगामी निवडणुकांना समोर जाण्याचे ठरविले आहे. शिवाय आम्ही राज्यात संपूर्ण २८८ जागा लढवणार असून मुख्यमंत्रीही आमच्याच महाशक्तीचा असेल, असे दावाही आमदार बच्चू कडू यांनी केला आहे. ते अमरावती येथे बोलत होते.



### महाशक्ती म्हणून आम्ही संपूर्ण २८८ जागा लढवणार- बच्चू कडू

आम्ही राज्याला चांगला पर्याय दिला पाहिजे म्हणून आम्ही तिसरा पर्याय दिलाय. देशात दिल्ली, पंजाब, बिहार याठिकाणी तिसरा पर्याय लोकांनी निवडून दिलाय. त्याचं प्रमाणे राज्यातही आम्हालाही लोक साथ देत निवडून देतील असा विश्वासही आमदार बच्चू कडूंनी बोलून दाखवला आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत आम्ही महाशक्ती म्हणून संपूर्ण २८८ जागा लढवणार आहोत. झेंडे दाखवून निवडणूक लढवणे आता बंद होईल. तसेच हा निर्णय घेत असताना आणि महाशक्ती स्थापन करण्याआधी मी एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांना भेटलो होतो. फक्त अजित पवार सोबत माझी भेट झाली नसल्याचेही ते म्हणाले.

## बहुजनांचा भगीरथ : कर्मवीर भाऊराव पाटील

बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणारे आधुनिक काळातील भगीरथ रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांची आज जयंती. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज या गावी २२ सप्टेंबर १८८७ रोजी झाला. सांगली जिल्ह्यातील ऐतवडे हे त्यांचे मूळ गाव होय. कर्मवीर भाऊराव पाटील हे लहानपणापासूनच बंडखोर प्रवृत्तीचे होते. तत्कालीन जातीव्यवस्थेत उच्च जातींकडून कनिष्ठ जातींवर होणाऱ्या अन्यायाची त्यांना खूप चीड होती. अस्पृश्यतेबद्दल त्यांच्या मनात प्रचंड राग होता. अस्पृश्य समाजाला उच्च वर्णीयांकडून जी वागणूक दिली जात होती त्याबाबत त्यांच्या मनात प्रचंड असंतोष होता. अस्पृश्य समाजाला विहिरीचे पाणी दिले जात नाही हे पाहून त्यांनी विहिरीचे रहाटच तोडून टाकले होते. कर्मवीर भाऊराव पाटलांना शिक्षणाची खूप आवड होती. त्यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापूर जिल्ह्यातील विटा या गावी झाले तर माध्यमिक शिक्षण कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये झाले. शालेय वयातच त्यांच्यावर छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांचा प्रभाव पडला. छत्रपती शाहू महाराज व महात्मा ज्योतिराव फुले यांना ते आदर्श मानू लागले. शिक्षण पूर्ण झाल्यावर ते साताऱ्यात गेले तीथे त्यांनी गरीब मुलांसाठी शिकवण्या सुरू केल्या. याच काळात त्यांनी मद्गना मास्तर, भाऊसाहेब कुदळे, नानासाहेब येडेकर यांच्या मदतीने दुधगावत दुधगाव शिक्षण मंडळाची स्थापना केली. या संस्थेमार्फत गरीब मुलांसाठी एक वसतिगृह सुरू केले. ४ ऑक्टोबर १९१९ रोजी कर्मवीरांनी सातारा जिल्ह्यातील काले गावात रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. बहुजन समाजातील मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करून त्यांना मोफत व दर्जेदार शिक्षण देणे हे रयत शिक्षण संस्थेचे मुख्य उद्दिष्ट होते. बहुजन समाजातील गरीब मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले. बहुजन समाजातील मुलांना केवळ पुस्तकी शिक्षण न देता त्यांनी त्यांना समता, बंधुता, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक बांधिलकी आदी मूल्यांची देखील शिकवण दिली. संस्थेत शिक्षण घेणाऱ्या मुलांना साताऱ्यात राहण्याची सोय व्हावी म्हणून त्यांनी वसतिगृह बांधले. या वसतिगृहाची जबाबदारी त्यांनी पत्नी लक्ष्मीबाई यांच्यावर सोपवली. लक्ष्मीबाई या वसतिगृहातील मुलांसाठी मायेची सावली बनल्या. वसतिगृह चालवण्यासाठी त्यांना आपले दागिने विकावे लागले. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत संस्था आणि वसतिगृह चालवण्याचा प्रयोग कर्मवीरांना करता आला तो लक्ष्मीबाई यांच्यामुळेच. कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेत कमवा आणि शिका योजना सुरू केली. या योजनेनुसार चालणारे पहिले फ्री अँड रेसिडेंशल हायस्कूल सातारा येथे सुरू करून त्या हायस्कूलला महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे नाव दिले. त्यानंतर याच नावाने त्यांनी अनेक शाळा काढल्या. १९४७ साली कर्मवीरांनी साताऱ्यात छत्रपती शिवाजी कॉलेज, तर १९५४ साली कराड येथे सदगुरु गाडगे महाराज कॉलेजची स्थापना केली. आपल्या संस्थेत प्रशिक्षित शिक्षकांचा वानवा पडू नये यासाठी त्यांनी अध्यापक विद्यालये देखील सुरू केली. भाऊराव पाटील यांच्या हयातीत रयत शिक्षण संस्थेने ५७८ प्राथमिक शाळा, ४३९ माध्यमिक शाळा, ( २७ मुलींसाठी ) ३८ वसतिगृह शाळा, १६० उच्च माध्यमिक विद्यालये, २१ तंत्रदान विद्यालये, ८ अध्यापक विद्यालये, ( १ मुलींसाठी ) ४१ महाविद्यालये (४ मुलींसाठी ) आणि ५ इंग्रजी माध्यमांची विद्यालये यांची स्थापना केली. रयत शिक्षण संस्थेचा विस्तार महाराष्ट्रातच नाही तर कर्नाटकातही झालेला आहे. त्यांनी लावलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या रोपट्याचा आज वटवृक्ष बनला आहे. बहुजन वर्गातील मुलांसाठी त्यांनी केलेले कार्य पाहून पुणे विद्यापीठाने १९५९ साली त्यांना डि. लीट ही मानाची पदवी बहाल केली. भारत सरकारनेही पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव केला. बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवणाऱ्या या आधुनिक भगिरथाचे ९ मे १९५९ रोजी निधन झाले. आज त्यांची १३७ वि जयंती. आजच्या दिवशी त्यांचे स्मरण करून त्यांना अभिवादन करणे हे बहुजनांचे आद्य कर्तव्य आहे. कर्मवीर भाऊराव पाटलांना विनम्र अभिवादन!

## स्वच्छता ही सवय बनावी – राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रत्येक मोठ्या कार्याची सुरुवात लहान लहान बाबींनी होत असते. सागरी किनारा स्वच्छतेसाठी आज जनजागृतीचा दिवस असून किनारा स्वच्छतेची ही सुरुवात मोठे रूप धारण करून 'स्वच्छ भारत, महान भारत' संकल्पनेला आकार देईल, असे प्रतिपादन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी केले. तर, समुद्रकिनारे स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी प्रत्येकाची असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

सागरी किनारा स्वच्छतेबाबत जनजागृतीसाठी सप्टेंबर महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी आंतरराष्ट्रीय सागरी किनारा स्वच्छता दिनाचे आयोजन केले जाते. या अनुषंगाने पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय व श्रम व रोजगार मंत्रालय, महाराष्ट्र शासन, बृहन्मुंबई महानगरपालिका, प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या सहकार्याने जुहू समुद्रकिनारा येथे समुद्रकिनारा स्वच्छता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव, मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, खासदार रवींद्र वायकर, आमदार अमित साटम, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, केंद्रीय वन आणि पर्यावरण विभागाचे विशेष सचिव तन्मय कुमार, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त डॉ. अश्विनी जोशी, पर्यावरण आणि हवामान बदल विभागाचे प्रधान सचिव प्रविण दराडे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव डॉ. अविनाश ढाकणे आदी यावेळी उपस्थित होते.

स्वच्छता अभियानासाठी विद्यार्थ्यांची लक्षणीय उपस्थिती असल्याबद्दल समाधान व्यक्त करून राज्यपाल म्हणाले, तरुणांमध्ये स्वच्छतेबाबत होत असलेली जागृती ही सकारात्मक बाब आहे. सांडपाणी स्वच्छ आणि प्रक्रिया करूनच सागरात गेले पाहिजे तसेच सागर किनारे प्लास्टिक आणि कचऱ्यापासून मुक्त करणे हे आमचे उद्दिष्ट आहे. निसर्गाने आपल्याला दिलेली प्रत्येक गोष्ट स्वच्छ स्वरूपातच निसर्गाला परत दिली पाहिजे, असे सांगून सिंगल युज प्लास्टिकचा वापर बंद करण्याच्या केंद्र सरकारच्या अभियानात राज्याचे पूर्ण सहकार्य असेल, असेही राज्यपालांनी यावेळी सांगितले.

# शेकडो शेतकऱ्यांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

## सोयाबीन कापसाला हमीभाव व नाफेड खरेदी सुरू करा

दैनिक आपला विदर्भ

■ नासीर शेख

**पातूर :** सोयाबीनला सहा हजार तर कापसाला दहा हजार रुपयांचा हमीभाव देऊन नाफेड खरेदी सुरू करण्याच्या मागणीसाठी पातुर तालुक्यातील शेतकरी राजा ग्रुपचे अध्यक्ष रवी डीगांबर सोनोने यांच्या नेतृत्वात गुरुवारी शेकडो शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला, या मोर्चामध्ये पातुर तालुक्यातील चान्नी मळसूर सायवणी बेलोरा देऊळगाव आदी २४ गावातील शेकडो शेतकऱ्यांचा समावेश होता. हे मोर्चा अकोल्याच्या लक्झरी बसस्थानकापासून पायी जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत पोहोचला, अनु जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले, शेतकरी राजा ग्रुपकडून पातुर तालुक्यात जनजागृती करून अनेक गावात शेतकऱ्यांशी संवाद सभा घेण्याचे कार्यक्रम सुरू आहे. दहा वर्षापूर्वी सोयाबीन कापसाला जे भाव होते,आज सुद्धा तेच भाव आहे. आणि खत बियाणे तिप्पट वाढले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेत मालाला हमीभाव देऊन नाफेड खरेदी सुरू करण्याच्या मागणीसाठी शेकडो शेतकरी एकवटले होते.






### २४ गावातील शेकडो शेतकऱ्यांचा समावेश

सोयाबीन कापसाला हमीभाव देऊन नाफेड खरेदी सुरू करण्याच्या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर पायी काढलेल्या मोर्चामध्ये पातुर तालुक्यातील २४ गावातील शेकडो शेतकऱ्यांचा समावेश होता.

सोयाबीनला सहा हजार तर कापसाला दहा हजार हमीभाव देऊन नाफेड खरेदी सुरू करण्याची मागणीसाठी २४ गावातील शेकडो शेतकऱ्यांनी गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर पायी मोर्चा काढला, आमची मागणी पूर्ण न झाल्यास हजारोच्या संख्येने पुन्हा मोर्चा काढण्यात येईल

**–रवी डीगांबर सोनोने, अध्यक्ष शेतकरी राजा ग्रुप**

## हायकोर्टाचा दणका! मुंबई विद्यापीठ सीनेट निवडणूक रविवारीच होणार

**मुंबई/प्रतिनिधी :** विद्यापीठाची सिनेट निवडणूक २२ सप्टेंबरला होणार होती, परंतू काही कारणांमुळे तिला पुन्हा स्थगिती देण्यात आली. पण शनिवारी संध्याकळी यावर हायकोर्टाने निर्णय दिला आहे. ज्यामध्ये ही निवडणूक ठरलेल्या दिवशी म्हणजे २२ सप्टेंबरलाच होणार असल्याचा निकाल दिला.

सलग दुसऱ्यांदा सिनेटची ही निवडणूक स्थगित करण्यात आली होती. परंतू अखेर या निवडणूकीसाठी मुहुर्त निघालाच. यापूर्वी १० सप्टेंबरला सिनेटच्या निवडणुकीसाठी मतदान होणार होतं. मात्र, तेव्हाही अचानक ही निवडणूक स्थगित करण्याचा निर्णय विद्यापीठानं जाहीर केला. त्यावर विद्यार्थी संघटनांनी नाराजी व्यक्त केली. राज्य सरकारने यासंदर्भात १७ ऑगस्टला विद्यापीठाला पत्र दिलं. या पत्रानंतर विद्यापीठानं ही निवडणूक स्थगित करण्याचा निर्णय घेतला होता.

त्यानंतर ही निवडणूक २२ सप्टेंबरला असल्याचं घोषीत करण्यात आलं. परंतू त्यानंतरही ही तारीख रद्द करण्यात आली. ज्यानंतर विद्यार्थी संघटनेनं हायकोर्टाचे दरवाजे ठोठावले, परिणामी याचा निकाल शनिवारी संघटनेच्या बाजूने लावण्यात आला.

पान १ वरून...

### महाराष्ट्र देशाच्या तर एमएमआर

लागणाऱ्या सर्व गोष्टी असल्यामुळे उद्योग आपल्या राज्यात येत आहेत. दाओसला जाऊन १ लाख ३७ कोटींच्या करारांवर स्वाक्षरी केली आहे. त्यातील बहुतांश उद्योगांचे कामही सुरु झाले आहे. ३ लाख ५० हजार कोटींच्या सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यात आल्या आहेत. नुकताच इलेक्ट्रॉनिक्स सेमिकंडक्टर चीप बनविण्याचाही प्रकल्प सुरु करण्यात आला आहे. लवकरच इलेक्ट्रॉनिक्स सेमिकंडक्टर चीप बनविण्याच्या प्रकल्पासाठी ८४ हजार कोटींचा करार होतोय. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर पॉवर, स्टील, औषध निर्माण अशा विविध क्षेत्रातील उद्योग येत आहेत. मी सर्व अधिकाऱ्यांना सक्त सूचना दिल्या आहेत की, उद्योग क्षेत्रातील कोणतीही तक्रार येता कामा नये. माझ्याकडे तक्रार आलीच तर मी त्या तक्रारीचे तात्काळ निराकरण करतो. राज्यात जास्तीत जास्त उद्योग आले तर राज्याची प्रगतीही जास्तीत जास्त होईल, यावर माझा ठाम विश्वास आहे.

महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे की, ज्याने मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेच्या माध्यमातून प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थीला विद्यावेतन देण्याचा निर्णय घेतला आहे. काही देश हे पर्यटन व्यवसायावर चालतात. आपल्या राज्याला तर ७२० किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभला आहे. आपण विकासाची वर्गवारी केली आहे. त्यामुळे आपल्या राज्याचा विकास जलद होणार आहे. हे शासन विकासाला चालना देणारे आहे. ठाण्यामधील धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण करून त्या इमारतींमधील सर्वांना क्लस्टर डेव्हलपमेंटच्या माध्यमातून हक्काचे घर देण्याचे काम सुरु केले आहे. सिडको आणि ठाणे महानगरपालिका हे काम करीत आहे. पहिल्या टप्प्यातील १७ हजार घरे बांधण्याचे काम वेगाने सुरु आहे, असेही ते म्हणाले.

पर्यावरण रक्षणाबद्दल बोलताना मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले की, ठाणे महानगरपालिकेने १ लाख २५ हजार झाडे लावली आहेत. २१ लाख हेक्टरमध्ये बांबू लागवड करीत आहोत. बांबू हा सर्वात जास्त ऑक्सिजन देतो. त्यामुळे बांबू लागवड पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त सिद्ध झाला आहे. आपल्या सर्वांना पर्यावरणाचे संतुलन राखावे लागेल, ही काळाची गरज आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशाला आर्थिक महासत्ता बनविण्याचे स्वप्न पाहिले आहे. हे स्वप्न साकार करावयाचे असेल तर नीती आयोगाच्या अहवालातील सूचनांप्रमाणे काम करणे आवश्यक आहे. याबाबतीत 'मित्रा' संस्थेने पुढाकार घेवून त्याप्रमाणे दिशा देण्याचे काम केले आहे. ठाणे जिल्ह्याची ४८ बिलियन डॉलर अर्थव्यवस्था आहे, सन २०३० पर्यंत ती १५० बिलियन डॉलर होणे हे आपले उद्दिष्ट आहे. ठाण्याचा जीडीपी ७.५ टक्के आहे, हा जीडीपी २० टक्क्यांवर आणण्याचा प्रयत्न करायचा आहे. ठाण्यामध्ये विविध लोकोपयोगी प्रकल्प राबविण्यात येत आहे. यातूनच खड्डेमुक्त रस्ते, सेंट्रल पार्क, ब्लू सी, एसटीपी प्लँट, प्रदूषणमुक्त पाणी यासारखे विविध उपक्रम सुरु आहेत, असे सांगून ते म्हणाले की, विकास आणि कल्याणकारी योजना राबविणारे तसेच राज्याच्या प्रगतीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अहोरात्र काम करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे.


मानसी सोनटक्के यांनी सूत्रसंचालन केले. ठाणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ.प्रशांत रोडे यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी विविध क्षेत्रातील उद्योजक, विद्यार्थी, अधिकारी आणि सामान्य नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विधानसभेत काँग्रेसच काय कुणालाही पाठिंबा नाही, वंचित नेते प्रकाश आंबेडकर स्पष्टच बोलले

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** आगामी विधानसभा निवडणुकांचे आता साऱ्यांना वेध लागले असून त्या अनुषंगाने राजकीय पक्षाकडून रणशिंग फुंकले जात आहे. दरम्यान, महाविकास आघाडी आणि महायुतीमध्येही जागावाटपाच्या चर्चा अंतिम टप्प्यात आल्या असून लवकरच जागावाटप घोषित होऊ शकते. तर दुसरीकडे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून ७ उमेदवारांची घोषणा करण्यात आली आहे. त्या पाठोपाठ आता वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा ॲड. प्रकाश आंबेडकर यांनीही विधानसभा निवडणुकांसाठी वंचितच्या ११ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. विशेष म्हणजे वंचितकडून विधानसभा निवडणुकांसाठी प्रथमच तृतीयपंथी उमेदवाराला देखील तिकीट देण्यात आलंय.

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ?ि. प्रकाश आंबेडकर यांनी आज मुंबई येथील पत्रकार परिषदेत वंचितच्या विधानसभा निवडणुकीतील उम `दवारांची पहिली यादी जाहीर केली. यावेळी मात्र



विधानसभेत काँग्रेसच काय कुणालाही पाठिंबा देणार नसल्याची मोठी घोषणा वंचित नेते प्रकाश आंबेडकर यांनी बोलताना स्पष्ट केली आहे. मागच्या लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळी काँग्रेसमधील काही उमेदवारांनी आम्हाला पाठिंबा मागितला होता. त्यानुसार आम्ही त्यांना जाहीर पाठिंबा दिला. मात्र आता विधानसभा निवडणुकीत आम्हाला कोणीही पाठिंबा मागितला तर आम्ही तो कुणालाही देणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीत वंचितने वेगळी रणनीती आखली असल्याची शक्यता आहे.

वंचितच्या ११ उमेदवारांची पहिली यादी जाहीर

रावेर मतदासंघातून शमिभा पाटील (तृतीय पंथी लेवा पाटील), सिंदखेड राजा मतदार संघातून सविता मुंढे (वंजारी), वाशिम मतदासंघातून मेघा किरण डोंगरे (बौद्ध), धामणगाव रेल्वे मतदासंघातून नीलेश विश्वकर्मा (लोहार), नागपूर दक्षिण–पश्चिम मतदारसंघातून विनय भांगे (बौद्ध), साकोली मतदासंघातून डॉ. अविनाश नन्हे (धीवर), नांदेड दक्षिण मतदासंघातून फारूक अहमद (मुस्लीम), लोहा मतदारसंघातून शिवा नारांगले (लिंगायत), औरंगाबाद पूर्व मतदासंघातून विकास दांडगे (मराठा), शेवगाव मतदासंघातून किसन चव्हाण (पारधी), खानापूर संग्राम माने ( वडार) यांना पहिल्या यादीत स्थान मिळाले आहे.

उमेदवारांना वेळ मिळावा म्हणून यादी जाहीर : प्रकाश आंबेडकर

प्रकाश आंबेडकर म्हणाले, वेगवेगळ्या ओबीसी संघटना आणि त्याचबरोबर आदिवासी समुहातील राजकीय पक्ष आहेत त्यांना सोबत घेऊन निवडणुकीत उतरवण्याचे ठरवले आहे. या आघाडीला अजून आम्ही नाव दिलेलं नाही, पुढे नाव देणार आहोत. काही जणांशी आम्ही बोलतोय, सोबतच काही संघटनांशी बोलतोय . लोकसभा निवडणुकीत आम्ही पाहिलं आहे, पैशाचा महापूर होता. आता महापुराचा महापूर येईल विधानसभेत असं आम्हाला वाटतं. त्यामुळे उमेदवारांना वेळ मिळावा म्हणून यादी जाहीर करतोय . रावेर, सिंदखेड राजा, वाशिम, धामणगाव रेल्वे, साकोली, लोहा, औरंगाबाद, शेवगाव, अनापूर ही पहिली यादी जाहीर करतो, असे देखील प्रकाश आंबेडकर म्हणाले.

# बांधकाम कामगारांना विविध योजनांच्या माध्यमातून सामाजिक सुरक्षा – उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### बांधकाम कामगार मेळावा; उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते सुरक्षाकवच कार्ड,संसार व सुरक्षा किटचे वाटप

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** विविध कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून सामान्य माणसाच्या जीवनात परिवर्तन घडविण्याच्या दृष्टीने राज्य शासन कार्य करीत आहे. बांधकाम कामगार मंडळाद्वारे राज्यातील ३८ लाखांवरील कामगारांची नोंदणी करून विविध योजनांच्या माध्यमातून त्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यात येत असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज बांधकाम कामगारांच्या मेळाव्यात केले. त्यांच्या हस्ते कामगारांना सुरक्षाकवच कार्ड, संसार व सुरक्षा किटचे वाटप करण्यात आले.

येथील गोपालनगर परिसरातील नवनिर्माण गृह संकुलाच्या मैदानावर आयोजित 'बांधकाम कामगार मेळाव्यात' उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. बांधकाम कामगार मंडळाचे माजी अध्यक्ष ओमप्रकाश उर्फ मुन्ना यादव, माजी महापौर संदीप जोशी, नगरसेविका सोनाली कडू आदी यावेळी मंचावर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, बांधकाम कामगार मंडळाच्या माध्यमातून कामगारांची नोंदणी करून त्यांना विविध शासकीय योजनांद्वारे सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यात येत आहे. बांधकाम कामगारांच्या मुलांना पहिली ते पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत देण्याची सोय करण्यात आली आहे. तसेच ज्या मुलांचा मानाच्या शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश झाला त्यांना शिक्षण शुल्क माफ करण्यात आले आहे. या कामगारांच्या कुटुंबियांना ५ लाखांपर्यंतचे उपचार मोफत देण्यात येत आहे. बेघर



कामगारांना 'अटल आवास योजना' आणि 'प्रधानमंत्री आवास योजने'च्या माध्यमातून ४ लाखांची आर्थिक मदत देऊन हक्काची घरे देण्यात आली. कौशल्य प्रशिक्षणाच्या माध्यमातून कामगारांच्या मुलांना कौशल्य आधारित शिक्षण देण्यात येत आहे.बांधकाम कामगारांना आज सुरक्षाकवच कार्ड देण्यात आले असून याद्वारे कामगारांच्या कुटुंबियांना आरोग्य,शिक्षण,घरकुल आदी १२ सेवा देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

राज्य शासनाने जनसामान्यांसाठी विविध कल्याणकारी योजना आणल्या आहेत. मुख्यमंत्री –माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिलांच्या बँक खात्यात दर महिन्याला १५०० रुपयांची मदत देण्यात येते. 'लेक लाडकी योजने'च्या माध्यमातून मुलीच्या जन्मापासून ते १८ वर्षा पर्यंत टप्प्या टप्प्याने १ लाखा पर्यंतची मदत देण्यात येत आहे. मुलींना मोफत उच्च शिक्षणाची सोय करण्यात आली आहे. राज्यातील १ कोटी महिलांना लखपतीदीदी करण्याचा निर्धार राज्य शासनाने घेतला आहे. युवकांच्या हाताला काम देण्यासाठी 'कमवा आणि शिका' योजने प्रमाणे 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' सुरू करण्यात आली असून या योजनेचा राज्यातील जास्तीत –जास्त युवकांनी लाभ घ्यावा, असेही श्री. फडणवीस म्हणाले.

या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात कामगारांना सुरक्षाकवच कार्ड, संसार व सुरक्षा किटचे वाटप करण्यात आले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# ग्रामस्थांनी स्वच्छता ही सेवा मोहिमेत सहभागी होऊन आपले गाव स्वच्छ करावे - सीईओ मंदार पत्की

## जिल्हा परिषद अधिकारी, कर्मचाऱ्यांचे कार्यालय प्रांगणात महाश्रमदान

दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी** : स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत 'स्वच्छता ही सेवा, हे अभियान जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामस्थाने या मोहिमेत सहभागी होऊन आपआपले गाव स्वच्छ करावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांनी केले.

अभियानांतर्गत जिल्हा परिषद प्रांगणात महाश्रमदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. स्वच्छता ही सेवा हे अभियान जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये दि.१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत राबविण्यात येत आहे. स्वच्छता विषयक विविध उपक्रम राबविण्यात येऊन राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जंयतीचे औचित्य साधून दि.२ ऑक्टोंबर हा दिवस स्वच्छ भारत दिवस म्हणून साजरा केला जाणार आहे.

या मोहिमेच्या माध्यमातून गावे स्वच्छ व्हावी, गावात स्वच्छतेची लोकचळवळ निर्माण होण्याकरीता स्वच्छतेचे उपक्रम गावस्तरावर राबविणे सुरु आहे. त्याअनुषंगाने शुक्रवारी जिल्हा परिषद कार्यालयातील प्रांगणात मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांच्या उपस्थितीमध्ये महाश्रमदान राबविण्यात आले. या श्रमदानात जिल्हा परिषदेच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, ग्रामपंचायत विभाग, महिला व बालकल्याण विभाग, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, समाजकल्याण विभाग, बांधकाम विभाग, पाणी व स्वच्छता विभाग, आरोग्य



विभाग, शिक्षण विभाग, सिंचन विभाग या सर्व विभागाचे खाते प्रमुख व कर्मचारी सहभागी झाले होते.

जिल्हा परिषदेमध्ये नियमित सफाई करणारे कर्मचारी तसेच सावित्री ज्योतीराव समाजकार्य महाविद्यालयातील स्वच्छता विभागाकडे प्लेसमेंटसाठी असलेले विद्यार्थी सुध्दा या महाश्रमदनामध्ये सहभागी झाले होते. यावेळी देवीदास ढगे या कर्मचाऱ्याने संत गाडगेबाबा आणि गजानन जडेकर या कलावंताने महात्मा गांधी यांची वेशभूषा करून श्रमदानामध्ये सहभाग घेतला. कार्यालयाचा परिसर स्वच्छ असल्यास कर्मचारी अधिक उत्साहाने काम करू शकतात, असे उद्गार मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांनी यावेळी काढले.

या मोहिमेंतर्गत एक झाड आईच्या नावे हा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांनी जिल्हा परिषदेच्या सायकल स्टॅण्डमध्ये आपल्या आईच्या नावे एक झाड लावले. यावेळी जिल्हा प्रकल्प संचालक, पाणी व स्वच्छता प्रकाश नाटकर आणि सर्व विभागाचे विभाग प्रमुख, अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्वच्छ भारत मिशनच्या सर्व सल्लागारांनी परिश्रम घेतले.

## संक्षिप्त...

### राजस्थान राज्याचे राज्यपाल हरीभाऊ बागडे यांनी घेतले साई समाधीचे दर्शन



दैनिक आपला विदर्भ

**शिर्डी/प्रतिनिधी** : राजस्थान राज्याचे राज्यपाल महामहिम हरीभाऊ बागडे यांनी आज श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी तुकाराम हुलवळे, मंदिर विभाग प्रमुख विष्णु थोरात, जनसंपर्क अधिकारी तुषार शेळके, संरक्षण अधिकारी रोहिदास माळी आदी उपस्थित होते.

राजस्थान राज्याचे राज्यपाल महामहिम हरीभाऊ बागडे यांनी श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतल्यानंतर त्यांचा श्री साईबाबा संस्थानचे वतीने श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी सत्कार केला. यावेळी उप मुख्य कार्यकारी अधिकारी तुकाराम हुलवळे, मंदिर विभाग प्रमुख विष्णु थोरात, जनसंपर्क अधिकारी तुषार शेळके, संरक्षण अधिकारी रोहिदास माळी आदी उपस्थित होते.

### जरांगे आणि हाके यांच्या शिष्टमंडळाची पोलिसांसोबतची बैठक संपली

#### वडिगोद्रीवरून अंतरवालीकडे जाणाऱ्या गाड्या दुसऱ्या मार्गाने वळवण्याचा घेतला निर्णय



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी** : मनोज जरांगे आणि लक्ष्मण हाके यांच्या शिष्टमंडळासोबत पोलिसांची बैठक पार पडली. आज आंदोलनाला भेट देण्यासाठी लोकांची गर्दी वाढली होती. दोनही समाजाकडून घोषणबाजी सुरु झाली होती. त्यामुळे तणावाचं वातावरण निर्माण होऊ नये म्हणून पोलिसांनी दोन्ही आंदोलकांच्या समन्वयकांसोबत बैठक घेतली होती. या बैठकीत हाके यांच्या आंदोलना जवळून जरांगे यांच्या आंदोलनाकडे जाणाऱ्या गाड्या वळवण्यावर एकमत झाले असल्याचे पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांनी सांगितले आहे.

### सुवर्णसंधी, मुंबई महापालिकेत निरीक्षकपदाची भरती, ९२ हजार रुपयांपर्यंत पगार मिळणार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : मुंबई महापालिकेतील कर निर्धारण आणि संकलन खात्याच्या आस्थापनेवर निरीक्षक पदासाठी भरती प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. मुंबई महापालिकेनं पात्र उमेदवारांकडून या संदर्भात अर्ज मागवले आहेत. निरीक्षक या पदाच्या १७८ जागांसाठी अर्ज प्रक्रिया राबवली जात आहे. पात्र उमेदवारांनी या भरती प्रक्रियेसाठी अर्ज करण्याच आवाहन करण्यात आलं आहे. निरीक्षक पदावर निवड झालेल्या उमेदवारांना चांगला पगार देखील दिला जाणार आहे.

मुंबई महापालिकेनं करनिर्धारण व संकलन खात्याच्या आस्थापनेवरील गट क मधील निरीक्षक या पदाच्या भरती प्रक्रियेसाठी ऑनलाईन पद्धतीनं अर्ज मागवले असून परीक्षा देखील ऑनलाईन पद्धतीनं होणार आहे. यासाठी मुंबई महापालिकेच्या वेबसाईटवर अर्ज सादर करण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

निरीक्षक पदावर निवड झालेल्या उमेदवारांना २९२००-९२३०० या वेतनश्रेणीप्रमाणं पगार मिळणार आहे. १७८ पदांपैकी अनुसूचित जाती प्रवर्गासाठी ११,अनूसुचित जमाती ३, विमुक्त जाती ३, भटक्या जमाती ४, भज २, इतर मागास प्रवर्ग ३२, सामाजिक शैक्षणिक मागास प्रवर्ग १८, ईडब्ल्यूएस १८ आणि खुल्या प्रवर्गासाठी ८७ जागा असतील.

निरीक्षक पदासाठी कोण अर्ज करणार?

निरीक्षक पदासाठी अर्ज करणारा उमेदवार कोणत्याही शाखेतील मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी परीक्षा उत्तीर्ण असणं आवश्यक आहे. दहावी किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेमध्ये १०० गुणांचा मराठी विषय (निम्नस्तर किंवा उच्चस्तर) घेऊन उत्तीर्ण असणं आवश्यक आहे. संगणकाचं ज्ञान असल्याबाबतचा अभ्यासक्रम पूर्ण केल्याचं प्रमाणपत्र असणं आवश्यक आहे. याशिवाय निरीक्षक पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराजवळ मराठी व इंग्रजी टंकलेखनाचे प्रत्येकी ३० शब्द प्रति मिनिट वेगाचे शासनाचे व्यवसायिक प्रमाणपत्र असावे. मुंबई महापालिकेनं जारी केलेल्या निरीक्षक पदाच्या भरतीनुसार उमेदवारांनी ऑनलाईन पद्धतीनं अर्ज करणं आवश्यक आहे. ऑनलाईन अर्ज सादर करण्यास एक महिन्यांचा वेळ देण्यात आला आहे. १९ ऑक्टोबरपर्यंत पात्र उमेदवार या पदासाठी अर्ज सादर करु शकतात. निरीक्षक पदासाठी ज्या उमेदवारांना अर्ज सादर करायचे आहेत त्यांनी ऑनलाईन पद्धतीनं अर्ज केल्यानंतर शुल्क देखील ऑनलाईन पद्धतीनं करणं आवश्यक आहे. खुल्या प्रवर्गासाठी अर्जाचं शुल्क १००० रुपये असेल तर आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांना ९०० रुपये शुल्क द्यावं लागणार आहे. पुढील काळात निरीक्षक पदाच्या संख्येत वाढ देखील होऊ शकते, असं मुंबई महापालिकेच्या जाहिरातीमध्य म्हटल आहे. त्यामुळं विद्यार्थ्यांनी शेवटच्या दिवसाची वाट न पाहता लवकरात लवकर ऑनलाईन अर्ज सादर करणं आवश्यक आहे. दरम्यान, अर्ज सादर करताना महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असल्याबाबतचे अधिवास प्रमाणपत्र सादर करावे लागणार आहे.

# समुद्र किनारे स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी प्रत्येकाची!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : प्रत्येक मोठ्या कार्याची सुरुवात लहान लहान बाबींनी होत असते. सागरी किनारा स्वच्छतेसाठी आज जनजागृतीचा दिवस असून किनारा स्वच्छतेची ही सुरुवात मोठे रूप धारण करून 'स्वच्छ भारत, महान भारत' संकल्पनेला आकार देईल, असे प्रतिपादन राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांनी केले. तर, समुद्रकिनारे स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी प्रत्येकाची असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

सागरी किनारा स्वच्छतेबाबत जनजागृतीसाठी सप्टेंबर महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी आंतरराष्ट्रीय सागरी किनारा स्वच्छता दिनाचे आयोजन केले जाते. या अनुषंगाने पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय व श्रम व रोजगार मंत्रालय, महाराष्ट्र शासन, बृहन्मुंबई महानगरपालिका, प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या सहकार्याने जुहू समुद्रकिनारा येथे समुद्रकिनारा स्वच्छता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

केंद्रीय वन आणि पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव, मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, खासदार रवींद्र वायकर, आमदार अमित साटम, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, केंद्रीय वन आणि पर्यावरण विभागाचे विशेष सचिव तन्मय कुमार, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त डॉ. अश्विनी जोशी, पर्यावरण आणि हवामान बदल विभागाचे प्रधान सचिव प्रविण दराडे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव डॉ. अविनाश ढाकणे आदी यावेळी उपस्थित होते.

स्वच्छता अभियानासाठी विद्यार्थ्यांची लक्षणीय उपस्थिती असल्याबद्दल समाधान व्यक्त करून राज्यपाल म्हणाले, तरुणांमध्ये स्वच्छतेबाबत होत असलेली जागृती ही सकारात्मक बाब आहे. सांडपाणी स्वच्छ आणि प्रक्रिया करूनच सागरात गेले पाहिजे तसेच सागर किनारे प्लास्टिक आणि कचऱ्यापासून मुक्त करणे हे आमचे उद्दिष्ट आहे. निसर्गाने आपल्याला दिलेली प्रत्येक गोष्ट स्वच्छ स्वरूपातच निसर्गाला परत दिली पाहिजे, असे सांगून सिंगल युज प्लास्टिकचा वापर बंद करण्याच्या केंद्र सरकारच्या अभियानात राज्याचे पूर्ण सहकार्य असेल, असेही राज्यपालांनी यावेळी सांगितले.

## आईने मोबाईल घेतल्याने मुलीने उचलले टोकाचे पाऊल; दुसऱ्या घटनेत ११ वर्षीय मुलाने संपवले जीवन


दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी** : अलिकडील काळात मोबाईलचा वापर हा गरजेचा बनलाय, मात्र तरुण पिढीकडून या मोबाईलचा दुरुपयोग होत असल्याच्याही तक्रारी पालकांकडून होत आहेत. सोशल मीडियावर तरुणाई आणि मोबाईल हा विषय नेहमीच चर्चेत असतो. त्यातच, मोबाईलवर विविध ॲपच्या माध्यमातून तरुणाई या सोशल जाळ्यात अडकत असल्याचे चित्र आहे. अनेकदा प्रेमसंबंधाचे कारणही मोबाईल ठरत आहेत. त्यातच, आता ठाणे जिल्ह्यातील प्रेमसंबंधातून दोघा तरुणाईने आपलं जीवन संपवलं आहे. कल्याण डोंबिवलीत दोन वेगवेगळ्या घटना घडल्याने जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. कल्याणमध्ये एका १९ वर्षीय तरुणीला आईने मोबाईल वापरण्यास नकार दिल्यामुळे त्या तरुणीने आत्महत्या केली, तर कल्याणमध्ये एका ११ वर्षीय मुलाला भेटण्याकरीता त्याची अल्पवयीन मैत्रीण घरात आली असता तिच्या आई-वडिलांनी मुलीची चौकशी करुन तिला तिच्या घरी सोडले. मात्र, आई-वडिल मुलीला तिच्या घरी सोडायला जाताच, इकडे मुलाने मुलाने घरातच आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पोलीस तपास सुरू आहे.

कल्याणमध्ये एका ११ वर्षीय मुलाच्या घरी भेटण्यासाठी १३ वर्षाची मैत्रीण आली होती. मात्र, त्या मैत्रीणीला तिच्या घरी सोडण्यासाठी मुलाचे आई वडिल गेले असता, घरात गळफास घेऊन मुलाने आपले जीवन संपवल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. कल्याण पूर्वेतील कोळसेवाडी परिसरात एका ११ वर्षाच्या मुलाने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. कोळसेवाडी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या मुलाला भेटण्यासाठी त्याची १३ वर्षाची मैत्रिण घरी आली होती. त्या मुलीला घरात पाहून मुलाच्या आईवडिलांनी तिची चौकशी केली. त्यानंतर मुलीला सोबत घेऊन ते तिच्या टिटवाळ्यातील घरी गेले. टिटवाळ्यातून आई-वडील घरी आल्यावर मुलाने आत्महत्या केल्याचे त्यांना दिसले. मुलाने नक्की कोणत्या कारणामुळे जीव दिला त्याचा पोलीस तपास करत आहेत.

डोंबिवलीतील मानपाडा पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या हेमांगी त्यांच्या मुलगी आणि मुलासोबत राहतात. त्यांच्या मुलीने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. मानपाडा पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. मुलगी एका महाविद्यालयात शिक्षण घेत होती, तिच्या आईला असा संशय होता की, आपली कन्या ही काही मुलांसोबत चॅटिंग करते. त्यामुळे आईने तिच्याकडून मोबाईल हिसकावून घेतला. यापूर्वी आईने तिच्याकडून मोबाईल हिसकावून घेतला होता, तेव्हा मुलीने आईला आत्महत्या करणार अशी धमकी दिली होती . शुक्रवारी तिच्या आईने पुन्हा तिचा मोबाईल हिसकावून घेतला. रागाच्या भरात तिने आत्महत्या केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास मानपाडा पोलिस करीत आहेत.

# आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना मिळाली तब्बल ७ वर्षांनी येणाऱ्या फुलांची माहिती



दैनिक आपला विदर्भ

**सिंधुदुर्ग/प्रतिनिधी** : निसर्ग किमयागार आहे त्याने जीवसृष्टीतल्या प्रत्येकाला आपली आपली म्हणून काही वैशिष्ट्ये दिली आहेत. अत्यंत विविधता असूनही निसर्ग ते सगळं उत्तम नियंत्रणात ठेवतो. सावंतवाडी तालुक्यातील चौकूळ गावात असे फुल आहे की जे तब्बल सात वर्षांनी फुलते. हीच माहिती इथल्या जिल्हा परिषदेच्या मुलांना आनंददायी शनिवार अंतर्गत शिक्षक जावेद तांबोळी यांनी प्रत्यक्ष झाडाजवळ जाऊन दिली आहे. या झाडाला कारव किंवा कारवीचे झाड म्हणतात.

सावंतवाडी तालुक्यात असलेल्या चौकूळ या गावात जवळजवळ ८०-९० टक्के कारवीचे झाडे आहेत. शिक्षण विभागाने दप्तर विना शाळा म्हणजेच आनंददायी शनिवार उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमांतर्गत मुलांना निसर्गातील वैशिष्ट्ये समजावीत यासाठी शिक्षक तांबोळी यांनी प्रत्यक्ष कारवीच्या झाडाजवळ शाळेतील मुलांना घेऊन गेले. त्याच बरोबर इथल्या स्थानिक नागरिकांनी देखील जिल्हा परिषद शाळेतील मुलांना कारवीच्या फुलांबद्दल माहिती दिली आहे. तब्बल सात वर्षांनी येणाऱ्या या फुलांमधून मधमाशा मध गोळा करतात त्यामुळे यंदा मोठ्या प्रमाणात मध उत्पादित होईल असे इथल्या स्थानिक लोकांचे म्हणणे आहे. फुलं पडल्यानंतर या झाडाची लाकडं इथले स्थानिक नागरिक वापरतात. पडलेल्या बियांमधून पुन्हा नवे कार्वीचे झाड उगवते मात्र या झाडांना फुले येण्यासाठी सात वर्ष लागतात अशी माहिती स्थानिकांनी दिली आहे.

# TRZY & TRZYX इनोव्हेशन्झने केली होलोकनेक्ट्सबरोबर भारतात प्रथमच होलोबॉक्स सादर करण्यासाठी भागीदारी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : भारतात इवेंट मार्केटिंग सेवा क्षेत्रात आघाडीवर असलेल्या ढ्ठनधद इनोव्हेशन्स ने काल मुंबईत एका समारंभात होलोकनेक्ट्स या कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित होलोग्राफ सेवा व्यवसायातील आघाडीच्या डच तंत्रज्ञान कंपनीच्या भागीदारीत अत्याधुनिक होलोबॉक्स सादर केला. ही धोरणात्मक भागीदारी म्हणजे होलोग्राफिक डिस्प्ले सेवांसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करून् भारतातील मार्केटिंग क्षेत्राचा कायापालट घडवून आणण्याच्या दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे. या समारंभात TRZYX इनोव्हेशन्झ होलोबॉक्स चे भारतातील एकमेव वितरक म्हणून नेमण्यात आल्याचे होलोकनेक्ट्स तर्फे जाहीर करण्यात आले. होलोबॉक्स हे होलोकनेक्ट्स चे अग्रेसर उत्पादन म्हणजे क्रांतिकारी होलोग्राफिक डिस्प्ले प्रणाली असून तिचा वापर केल्यास थ्री डी दृश्ये पाहण्यासाठी वेगळ्या चषम्यांची आवशयकता लागत नाही. सुबक रचना असलेला आणि वापरण्यास सोपा होलोबॉक्स ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी तसेच उत्पादनांची प्रात्यक्षिके, ग्राहक सहभागासह जाहिरात मोहिमा आणि अनुभवाधारित मार्केटिंग या साठीच्या नव्या पद्धती स्थापित करील. होलोबॉक्स आणि होलोबॉक्स मिनी ही दोन्ही उपकरणे 'प्लग अँड प्ले' तत्वावर चालतात, वापरायला अत्यंत सोपी असतात आणि ती चालविण्यासाठी वीज आणि इंटरनेट जोडणी एवढीच आवश्यकता असते.

होलोबॉक्स चे भारतातील एकमेव वितरक या भूमिकेतून ढ्ठनधद इनोव्हेशन्झ भारतीय व्यवसायांना होलोग्राफिक तंत्रज्ञान वापरण्याची क्षमता आत्मसात करण्याची संधी देईल कंपनीचे विस्तृत वितरण जाळे आणि भारतीय बाजारपेठेची उत्तम समज याला होलोकनेक्ट्स च्या होलोग्राफिक्स क्षेत्रातील नवनवीन उत्पादनांची जोड मिळाल्यामुळे



विविध उद्योगांमधील मार्केटिंग व्यावसायिकांना अनेक नव्या कल्पना विकसित करणे शक्य होईल.

पदार्पण समारंभात होलोबॉक्सचा बहुआयामी वापर आणि रिटेल, वाहन निर्मिती, शिक्षण आणि मनोरंजन अशा विविध क्षेत्रातील प्रभावी वापर याचे दर्शन घडविण्यात आले.

होलोबॉक्स चा वापर करून भारतीय उत्पादनांचे विविध ब्रँड मार्केटिंग प्रणालींच्या गर्दीतून मार्ग काढत अपेक्षित ग्राहक समुदायांशी थेट संपर्कात येतील आणि मार्केटिंग च्या संपूर्ण परिघात एक क्रांति घडेल अशा उद्देशाने हे उपकरण भारतात सादर करण्यात आले आहे. त्याच्या उपयोगाच्या शक्यता अमर्याद आहेत. इन स्टोअर प्रदर्शन, आभासी वातावरण निर्माण करून उत्पादन सादर करणे, ग्राहकाला प्रत्यक्ष अनुभव घेणे शक्य करणे, व्यापारी प्रदर्शने, शैक्षणिक विषयांवरील सादरीकरण अशा अनेक उद्दिष्टांसाठी त्याचा मोठा उपयोग होईल.

जुन्या पद्धतींना फाटा देत नवे पर्याय देणारे तंत्रज्ञान आणि मार्केटिंग क्षेत्रात कायापालट घडवून आणण्याची क्षमता यामुळे होलोबॉक्स भारतीय मार्केटिंग मधील गेम चेंजर ठरणार आहे.

# निवडणुकीच्या तोंडावर मेळाव्याची चढाओढ

## मेहकर विधानसभा मतदार संघातील चित्र

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी : विधानसभा निवडणूक ही जशी जशी जवळ येत आहे. तसतसे राजकीय वातावरण चांगलेच गरम होत आहे. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राजकीय पक्ष व संघटनांकडून मिळाव्याचे आयोजन केल्या जात असून मेळाव्याची जणू चढाओढ लागल्याचे चित्र मेहकर मतदार संघात दिसून येत आहे.**



विधानसभा निवडणूक ही पुढील महिन्यात होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यानुसार राजकीय पक्षांनी आपली राजकीय फिल्डिंग लावणे सुरू केली आहे. तर, इच्छूक उमेदवारांकडून सुद्धा मतदार संघात भेटी देऊन मतदार व पदाधिकारी तसेच प्रतिष्ठीत नागरिकांच्या भेटीघाडी सुरू केल्या आहेत. तसेच इच्छूक उमेदवारांकडून पक्ष मिळावे, सामाजिक कार्यक्रम यास इतर कार्यक्रमाचे आयोजन करून मतदारांना आपल्याकडे आकर्षीत करण्याचा प्रयत्न पक्षांकडून केला जात आहे. आगामी होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत या मेळाव्याच्या माध्यमातून आपल्या पक्षाला पक्षाच्या उमेदवाराला मतदानाचा फायदा व्हावा हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून राजकीय पक्षाने मेळाव्याचे आयजन सुरू केले आहे. मेहकर मतदार संघातही राजकीय पक्ष व सामाजिक संघटनेच्या वतीने मेळाव्याची आयोजन करून चढाओढ सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे. विविध राजकीय पक्ष व सामाजिक संघटनेने मतदारसंघात सर्कलनिहाय, तालुका निहाय, यासह मोठ्या गावाचे लोकसंख्या बघून मतदारांना आपल्याकडे खेचण्याकडे मेळाव्याचे आयोजन करणे सुरू केले आहे. त्यामुळे मतदारसंघात मेळाव्या मेळाव्याचे आयोजन करण्याची स्पर्धा लागल्याचे चित्र दिसून येत आहे.इच्छूक उमदेवारांकडून स्थानिक पदाधिकारी तसेच पक्षाचे वरिष्ठ पदाधिकारी व नेते बोलवून त्या ठिकाणी मतदारांना मार्गदर्शन केले जात आहे. एरवी पाच वर्ष कधीही न दिसणारे पक्ष पदाधिकारी व कार्यकर्ते आता मात्र चांगले सतर्क झाले असल्याचे चित्र मेहकर मतदार संघात होत असलेल्या मेळाव्यावरून दिसून येत आहे. तसेच या मेळाव्यात आम्ही विकास करणार असल्याचे आश्वासन देत मतदारांना आतापासूनच आमिष दाखविले जात आहे. तर मतदार राजा आता हुशार झाल्याने या पदाधिकार्यांच्या अमिषाला बळी न पडता त्यांना प्रश्न करीत त्यांची बोलती बंद केली जात आहे.त्यामुळे अनेकवेळा अनेक पदाधिकारी व पक्षाचे नेते हे कोंडीत अडकत असल्याचे सुद्धा दिसून आले आहे. मेहकर विधानसभा मतदार संघात आता सर्वच पक्षाच्या पदाधिकार्यांनी व कार्यकर्त्यांनी तसेच सामाजिक संघटनांच्या वतीने मोठमोठ्या मेळाव्याचे आयोजन केले जात आहे. त्यावरून राजकीय वातावरण सुद्धा चांगलीचे गरम होत असल्याचे दिसून येत आहे. तर आयोजित मेळाव्यात पदाधिकारी तथा आयोजक हे विरोधकांवर जहरी टिका करीत असल्याने राजकीय वातावरणात खळबळ उडत असल्याचे चित्र सुद्धा दिसून येत आहे. आगामी होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर मात्र राज्यासह बुलडाणा जिल्ह्याचे व मेहकर मतदार संघाचे राजकारण सुद्धा गरम होत असल्याचे दिसून येत आहे.

> मेळाव्यासाठी रोजाने नागरिक विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मेळाव्याचे आयोजन केले जात असले तरी, या मेळाव्याला अपेक्षीत गर्दी जमविण्यासाठी आयोजकांकडून अनेक ठिकाणी मजुरीने नागरिकांना आणल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे. आता तर पुढील काही दिवसामध्ये सोयाबीन कापणीचा हंगाम असल्याने मजूरही मिळणे कठीण होणार असल्याचे बोलले जात असून मजुरांच्या दरातही दुप्पटीने वाढ होणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात व गावागावात होत आहे.



**देविदास खनपटे**
मुख्य संपादक

# विधानसभेच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांचा मेळावा

## आज शिवसेनेच्या लोणार मेहकर तालुक्यातील पदाधिकारी,कार्यकर्त्यांचा मेळावा

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** लोणार तालुक्यातील शिवसेनेचे सर्व पदाधिकारी आणि सक्रिय कार्यकर्त्यांचा मेळावा मेहकर येथे रविवारी तारीख २२ रोजी वृंदावन लॉन, बायपास रोड येथे सकाळी दहा वाजता आयोजित करण्यात आला आहे. केंद्रीय आयुष, आरोग्य, कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव ,आमदार संजय रायमुलकर यावेळी मार्गदर्शन करणार आहेत.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीकोनातून या महत्त्वाच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख प्रा. बळी मापारी ,युवासेनेचे जिल्हाप्रमुख ऋषी जाधव, महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख मायाताई म्हस्के , उपजिल्हाप्रमुख राजेंद्र गाडेकर, मेहकर तालुकाप्रमुख सुरेश तात्या वाळूकर, लोणार तालुकाप्रमुख भगवानराव सुलताने ,मेहकर शहर प्रमुख जयचंद भाटिया, लोणार शहर प्रमुख पांडुरंग सरकटे, युवा सेनेचे तालुका अध्यक्ष भूषण घोडे ,युवासेनेचे तालुकाप्रमुख गजानन मापारी, महिला आघाडीच्या तालुकाप्रमुख कविताताई दांदडे ,अंजलीताई गवळी, वैशालीताई सावजी आदींच्या प्रमुख उपस्थितीत हा मेळावा पार पडणार आहे.

# उद्या सकल धनगर समाजाचा रास्तारोको आंदोलन

## पंढरपूर येथे सुरू असलेल्या उपोषणाला पाठिंबा



दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** धनगर आरक्षण संदर्भात पंढरपूर येथे सुरु असलेल्या धनगर बांधवांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी सोमवारी दि. २३ सप्टेंबर रोजी डोणगाव येथील गोहोगाव फाटा येथे सकाळी ११ वाजता रास्तारोको आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.

या आंदोलत समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

महाराष्ट्रामध्ये धनगर समाज हा अतिशय गरीब असून मेंढपाळ व्यवसाय करून आपला कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहेत. घटनेनुसार धनगर समाजाला एसटीमध्ये आरक्षण देण्यात आले आहे. मात्र सरकारकडून त्याची अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे धनगर समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी लोकशाही मार्गाने व शांततेने गेल्या अनेक वर्षापासून आंदोलन निवेदन व मागणी करण्यात येत आहे. मात्र सरकार गंभीरतेने घेत नसून धनगर आरक्षणाकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे धनगर समाज बांधवांचे मुले मुली विविध योजनेपासून वंचित राहत असून समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी पंढरपूर येथे उपोषण करण्यात येत आहे.या उपोषणाला पाठिंबा म्हणून दि. २३ सप्टेंबर रोजी डोणगाव येथील गोहोगाव फाटा येथे सकाळी ११ वाजता रास्तारोको आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. या आंदोलनात समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# २४ सप्टेंबरला ठरणार रिसोड बाजार समितीचा सभापती

## तेरा संचालक अज्ञातस्थळी; उपसभापतीवरही अविश्वास दाखल

दैनिक आपला विदर्भ

■ प्रभाकर पाटील

**रिसोड :** संजय शिंदे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर तसेच सतत या ना त्या कारणाने चर्चेत असलेल्या येथील बाजार समितीमध्ये नाट्यमय घडामोडीनंतर अखेर २४ सप्टेंबर रोजी नवीन सभापतीची निवड केली जाणार आहे मागील दोन दिवसापासून १३ संचालक अज्ञात स्थळी रवाना झाले आहेत उपसभापती वरही अविश्वास दाखल झाल्याची विश्वासनीय माहिती आहे.

येथील बाजार समितीची निवडणूक ३० एप्रिल २०२३ रोजी झाली होती मागील चार ते पाच दशकापासून माजी खासदार अनंतराव देशमुख यांचे बाजार समितीवर वर्चस्व राहिले आहे परंतु २०२३ मध्ये झालेल्या अटीतटीच्या या निवडणुकीमध्ये माजी खासदार अनंतराव देशमुख यांच्या सहकार विकास आघाडीचे १० तर आमदार अमित झनक यांच्या शेतकरी विकास आघाडीचे ०८ संचालक निवडून आले होते ऐनवेळी संजय शिंदे हे झनगटात दाखल झाल्यामुळे संख्याबळ तुल्य झाले होते त्यामुळे यावेळी सभापती व उपसभापती ची निवड ही ईश्र चिठ्ठीने झाली होती सुदैवाने आमदार झनक गटाचे संजय शिंदे सभापती तर उबाठाचे राजाराम आरु हे उपसभापती विराजमान झाले होते मागील काळात सभापती व उपसभापती यांनी पारदर्शकपणे व भ्रष्टाचार विरहित प्रशासन चालवण्याचा आटोकाट प्रयत्न केला परंतु काही महत्त्वाकांशी लोकांनी आपसी संगणमत करून सभापती व उपसभापती यांच्यावर वेगवेगळे मुद्दे उपस्थित करून वेगवेगळ्या माध्यमाद्वारे दबाव तयार केला सत्ताधारी गटातील संचालकाचे पाठबळ कमी झाल्यामुळे व सतत विरोधात खलबते सुरू असल्यामुळे संजय शिंदे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला परंतु उपसभापती सुद्धा राजीनामा देणार असल्याची चर्चा होती परंतु ते तीर्थक्षेत्र दर्शनासाठी कन्याकुमारी रामेश्र्वरला गेलेले होते त्यांच्याशी कोणतीही चर्चा न करता घरी पोहोचेपर्यंत १३ संचालकांनी त्यांच्यावर अविश्वास दाखल केला आहे संजय शिंदे हे ईश्र्वर चिठ्ठी ने निवडून आले होते २५ मे २०२३ रोजी शिंदे यांनी आपल्या पदाचा कार्यभार सांभाळा होता परंतु मागील दीड वर्षापासून बाजार समितीच्या वर्तुळामध्ये धुसफूस वाढली होती सतत या ना त्या कारणाने शिंदे यांचा दीड वर्षाचा कालखंड वादग्रस्त ठरला होता अखेर त्यांनी १३ सप्टेंबर रोजी आपल्या पदाचा राजीनामा दिला आमदार झनक समर्थित शेतकरी विकास आघाडीचे चार संचालक माजी खासदार अनंतराव देशमुख यांच्या गटात दाखल झाल्यामुळे त्यांचे संख्याबळ हे १३ झाले आहे तरीही एनवेळी दगा फटका होऊ नये म्हणून मागील दोन दिवसापासून १३ संचालक अज्ञात स्थळी रवाना झाले आहेत २४ सप्टेंबर रोजी निवडणूक होऊ घातली असून एन वेळी कोणाच्या गळ्यात सभापती पदाची माळ पडणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> सभापती संजय शिंदे यांनी १३ सप्टेंबर रोजी आपल्या पदाचा राजीनामा दिला असल्याची माहिती माध्यमाद्वारे मिळाली मी बाहेरगावी असल्यामुळे माझ्या राजीनाम्याबद्दल कोणीही चर्चा केली नाही आकस्मिकपणे अविश्वास दाखल केल्याची माहिती मला माध्यमाद्वारे मिळाली माझ्यावर अविश्वास आणण्याचे कारण मला कळले नाही.
> **–राजाराम आरु**
> **उपसभापती, बाजार समिती रिसोड.**

> झनक गटाचे राहिलेले पाच संचालक बिन शर्थ पाठिंबा देणार असल्याची माहिती आहे त्यामुळे ही निवडणूक बिनविरोध होणार असल्याची चर्चा बाजार समितीच्या वर्तुळामध्ये आहे.

## विविध वृत्त...

### शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्या उपस्थितीत होणार मेहकरात बैठक

दैनिक आपला विदर्भ





**मेहकर/प्रतिनिधी :** आगामी विधानसभा निवडणुकीची घोषणा कधीही होण्याची शक्यता असल्याने सर्वंच राजकीय पक्ष व नेते तयारीला लागल्याचे दिसून येत आहे. त्याचं अनुषंगाने मेहकर विधानसभा निवडणुकीची रणनीती आखण्यासाठी शेतकरीनेते रविकांत तुपकर यांच्या प्रमुख उपस्थितीत मतदारसंघातील कार्यकर्ते, पदाधिकारी यांची महत्वपूर्ण बैठक जिल्हाध्यक्ष डॉ. ज्ञानेश्र्वर टाले यांनी जानेफळ रोडवरील के.जी,एन, कॉम्प्लेक्स मध्ये दि.२२ सप्टेंबर रोज रविवारी ११ वाजता मेहकर येथे आयोजित केली आहे. सदर बैठकीत आगामी निवडणुकीची रणनीती ठरविण्यात येणार आहे. तर सोयाबीन–कापूस दरवाढ, पीकविमा, नुकसान भरपाई व मागण्यांसाठी कार्यकर्त्यांसोबत चर्चा–विनिमय, संघटनेची संघटनात्मक बांधणी आदी संदर्भात, शेतकरी नेते रविकांत तुपकर मार्गदर्शन करणार आहेत.यासाठी जिल्हाध्यक्ष डॉ ज्ञानेश्र्वर टाले यांनी मेहकर–लोणार मतदारसंघातील कार्यकर्ते, पदाधिकारी यांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

### मशीद परिचय कार्यक्रमात शेकडोंची उपस्थिती; खेट्री येथे हिंदू मुस्लिम एकोपाचा प्रतीक





दैनिक आपला विदर्भ

■ नासीर शेख

**पातूर :** ईद मिलादुन्नबी निमित्त हिंदू मुस्लिम व पोलीस प्रशासन यांच्या संकल्पनेनुसार डॉ. मोहिबूल हक यांच्या मार्गदर्शनात शुक्रवारी २० सप्टेंबर रोजी पातुर तालुक्यातील खेट्री येथे मशीद परिचय कार्यक्रमात हिंदू मुस्लिम एकोपाचा संदेश देण्यात आला, या कार्यक्रमात गावासह परिसरातील शेकडो हिंदू मुस्लिम बांधवांनी हजेरी लावली, हिंदू मुस्लिम सलोखा ठेवण्याबाबत अनेक प्रमुख पाहुणे यांनी मार्गदर्शन केले, या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून चान्नी ठाण्याचे ठाणेदार रवींद्र लांडे, डॉ. उमर काळे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष कृष्णा अंधारे, शेतकरी जागर मंचाचे संयोजक प्रशांत गावंडे, अड उमेश शिंदे, महाराज गोपाल गायकी, विजयकुमार ताले, गौरव देशमुख, रामकुमार मानकर, भाजपचे डॉ. विठ्ठल ताले, दशरथ खंडारे, तसेच गावातील प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरपंच अरुण पूजई, पोलीस पाटील भगवंत ताले, दगडा अप्पा, सोपान ताले, अजिंक्य गावंडे, सुरेश झोडपे, शिवसेनेचे सर्कल प्रमुख मो. आसीफ सुनील झोडपे, संकेत गावंडे, नितीन डहाळे, विठ्ठल पाचपोर, भगवंत झोडपे आदी होते, कार्यक्रमाचे संचालन अड मो.रेहान तर आभार प्रदर्शन डॉ. मोहिबुल हक यांनी केले

### अमरावतीच्या एसडीओ कार्यालयात शेतकऱ्याने घेतला विषाचा घोट!

**अमरावती/प्रतिनिधी :** अमरावतीमधील उपविभागीय अधिकारी तेजश्री कोरे यांच्या समक्ष त्यांच्या कार्यालयात विषारी द्रव्य प्राशन करून एका शेतकऱ्याने आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना शुक्रवारी (दि. २०) दुपारी साडेतीन वाजता घडली. अनेक दिवसांपासून शेती अधिग्रहणाचा मोबदला न मिळाल्याने शेतकऱ्याने टोकाचे पाऊल उचलल्याची प्राथमिक माहिती आहे. दिलीप तुळशीराम ढगे (५२, रा. उजोना, ता. दारव्हा) असे आत्महत्येचा प्रयत्न केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे.

प्राप्त माहितीनुसार, दिलीप ढगे यांच्यासह एकूण १४ वारसांच्या नावावर नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील सालोड येथील ६.७४ हेक्टर आर शेत जमीन चांदी नदी प्रकल्पाकरिता संपादित केली आहे. परंतु, या प्रकरणात आपसी विवादामुळे संबंधित भूधारकांना मोबदल्याची रक्कम देण्यात आली नव्हती. मात्र, सर्व व्यवस्थित झाल्यानंतर जमिनीच्या भूसंपादनाच्या मोबदल्याची रक्कम मिळण्यासाठी रामकृष्ण ढगे वारंवार चकरा मारूनही समाधानकारक उत्तर नाही १६ ऑगस्टला उपविभागीय अधिकाऱ्यांनी आवश्यक दस्तावेजांसह शेतजमिनीशी संबंधितांना बोलावले होते. आम्ही सर्व एसडीओ कार्यालयात हजर होतो. मात्र, एसडीओ कोरे कार्यालयात नसल्याने सुनावणी झाली नाही. त्यानंतरही दिलीप ढगे व इतरांनी सुनावणीच्या तारखेसाठी वारंवार एसडीओ कार्यालयात चकरा मारल्या. याप्रकरणी सम ाधानकारक उत्तर न मिळाल्याने दिलीप ढगे यांनी टोकाचे पाऊल उचलले, अशी माहिती दिलीप ढगे यांचे बंधू जगदीश ढगे यांनी दिली.

कागदपत्रांचा अभाव होता

ईलेक्शन ड्युटीवर असलेल्या एका स्थानिक नायब तहसीलदारांचा अपघात झाल्यामुळे मी रुग्णालयात गेले होते. त्यामुळे सुनावणीला हजर राहू शकली नाही. मात्र, त्यांच्या प्रकरणात मूळ कागदपत्रांचा अजूनही अभाव आहे, असे चांदूर रेल्वे उपविभागीय अधिकारी तेजश्री कोरे यांनी सांगितले.



### दिग्रस येथील शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत संविधान मंदिराचे उद्घाटन

खा संजय देशमुख यांची उपस्थिती

दैनिक आपला विदर्भ

**दिग्रस/प्रतिनिधी :** दिग्रस येथील शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये खा.संजय देशमुख यांच्या हस्ते नुकतेच संविधान मंदिराचे उद्घाटन खा.संजयभाऊ देशमुख यांच्या हस्ते संपन्न झाले. अध्यक्षस्थानी संस्थेचे प्राचार्य रमेश कहाळे होते.

प्रमुख अतिथी म्हणुन यंशस्वी उद्योजक तथा आय. एम. सी. सदस्य विष्णुपंत बेलगमवार व प्रा. पुंडलिक दिवे, तर बीएनबी महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. अजय जाधव प्रमुख वक्ता म्हणून उपस्थित होते.यावेळी खा संजय देशमुख यांच्या हस्ते संविधान मंदिराचे रीतसर उद्घाटन करण्यात आले. अनेक मान्यवरांनी आपले विचार मांडून आजच्या काळात भारतीय संविधानाची उपयोगिता व महत्व यावर विस्तृतपणे विवेचन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनुसया पुसांडे यांनी केले. प्रास्ताविक निदेशक भूषण देशपांडे यांनी तर आभार प्रदर्शन संजय महल्ले शिल्पनिदेशक यांनी केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मिनाक्षी ठोसर, गोपाल काजळे, सचिन राठोड, विशाल जाधव, विष्णू पवार , बळीराम ठवकर, योगेश राऊत, अमोल राऊत, विवेक चव्हान, पृथ्वीराज घाटगे , सुमित वलीवकर , काशिनाथ मस्के , सारंग मस्के तसेच संस्थेचे सुरक्षा रक्षक यांनी अथक परिश्रम घेतले.

### सुपर मार्केटला भीषण आग; अग्निशमन दलाकडून आग विझवण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यातील वडगाव शेरी परिसरात भीषण आगीची घटना घडली आहे. वडगाव शेरी, मतेनगर, हिरामण हॉस्पिटल जवळ सुपर मार्केटला भीषण आग लागली. अग्निशमन दलाची ८ वाहने दाखल झाली आहेत. आग विझवण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत.